सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

उशिप्र-११२५/प्र.क.५१/बीपीएड-एमपीएड/निकाल/२१७४ दिनांक : २७/०६/२०२५

# जाहीर सुचना
## बी.पी.एड सीईटी २०२५ व एम.पी.एड सीईटी २०२५
## सुधारित निकाल आणि गुणपत्रकाबाबत

बी.पी.एड आणि एम.पी.एड सीईटी २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर बी.पी.एड.चे दोन आणि एम.पी.एड.चा एका उमेदवाराने सीईटी सेलला भेट दिली होती. या उमेदवारांनी सीईटी सेलच्या निदर्शनास आणून दिले की त्यांनी संबंधित महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन सीईटी परीक्षा आणि फील्ड टेस्ट दिली असली तरी त्यांचा निकाल त्यांच्या लॉगिनमध्ये दिसत नाही आणि ते त्यांचे स्कोअर कार्ड डाउनलोड करू शकत नाहीत.

उमेदवारांच्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी ऑनलाइन सीईटी परीक्षा आणि फील्ड टेस्ट बाबतची माहिती तपासली असता एका एम.पी.एड.व बी.पी.एड महाविद्यालयाने या उमेदवारांना फील्ड टेस्ट मध्ये गैरहजर असल्याचे दाखवले आहे असे आढळले. या बाबत संबंधित महाविद्यालयाने आपली चूक मान्य केली आहे.

सीईटी सेलने ताबडतोब अंतर्गत समिती स्थापन केली. महाविद्यालयांकडून मिळालेल्या निकालांच्या आकडेवारीची पडताळणी केल्यानंतर समितीने असे निरीक्षण नोंदवले की एम.पी.एड कॉलेजने एका उमेदवाराला फील्ड टेस्टमध्ये हजर असूनही गैरहजर दाखवले आहे. बी,पी,एड कोर्समध्येही अशीच चूक आढळून आली आहे ज्यामध्ये दोन उमेदवारांना फील्ड टेस्टमध्ये हजर असूनही गैरहजर दाखवण्यात आले आहे.

वस्तुस्थिती लक्षात घेता, ज्या उमेदवारांना अनुपस्थित दाखवण्यात आले होते त्यांना आता संबंधित अभ्यासक्रमांच्या निकालात समाविष्ट केले जात आहे. निकालाच्या डेटामध्ये या उमेदवारांची नोंद केल्यानंतर, असे दिसून येते की मूळ पर्सेंटाईल अधिक दोन दशांश स्थानापर्यंत कोणताही फरक पडत नाही. तथापि तिसऱ्या दशांश ते पाचव्या दशांश स्थानापर्यंत अत्यंत सूक्ष्म बदल होऊ शकतो.

बी.पी.एड आणि एम.पी.एड अभ्यासक्रमांच्या सर्व उमेदवारांना त्यांचे नवीन स्कोअर कार्ड डाउनलोड करण्यासाठी आणि त्यांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अर्जामध्ये नवीन स्कोअर कार्ड अपलोड करण्यासाठी सूचित करत आहे.स्कोअर कार्ड डाउनलोड करण्याची लिंक २८/०६/२०२५ पासून प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लाईव्ह केली जाईल. उमेदवारांनी या बदलाची नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष
महाराष्ट्र राज्य, मुंबई